
# हिंदू वारस कायदे



# डॉ. संजय कुंडेटकर, उपजिल्हाधिकारी

बी.ए; एन.डी.; डी.मॅग; एम.बी.ए; एम.डी.; पीएच. डी.

# भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५



♦भारतीय उत्तराधिकार कायदा, ३० सप्टेंबर १९२५ रोजी अंमलात आला. त्याद्वारे परंपरेशी संबंधित सर्व भारतीय कायदे एकत्र करण्यात आले. या कायद्यात ११ भाग, ३९१ कलमे आणि ७ परिशिष्ट यांचा समावेश आहे.

♦ हा कायदा एकत्र कुटुंबातील, मृत्युपत्र न करता मयत झालेल्या व्यक्ती आणि मृत्युपत्र केलेले असल्यास त्यात नमूद उत्तराधिकारी यांना लागू आहे.

♦ सर्वसाधारणपणे मुस्लिम धर्मिय वगळता इतर सर्व धर्मियांना उदा. हिंदू, ख्रिश्चन, पारसी इत्यादींना हा कायदा लागू होतो. भारतीय मुस्लिमांना या कायद्यातील फक्त काही तरतुदी लागू होतात.

♦ या कायद्यान्वये मृत्युपत्र न करता मयत झालेल्या हिंदू, मुसलमान व पारसी वगळता इतर धर्मिय व्यक्तींचे वारस ठरविणेसाठी प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:-

♦ कलम- २ (एच) अन्वये मृत्युपत्राची व्याख्या दिली आहे.


♦ भारतीय वारसा कायदा १९२५, भाग ६ मध्ये कलम ५७ पासून मृत्युपत्राबाबत तरतुदी नमुद आहेत. कलम ५७ म्हणजे हिंदू विल्स एक्ट, १८७० च्या कलम २ ची पुनरावृत्ती आहे.

♦ कलम ३२ ते ४९ मध्ये, जेव्हा मयतामागे अपत्य अगर जवळचे नातेवाईक असतील तेव्हा मयताची मालमत्ता कोणाला आणि किती प्रमाणात मिळेल याचे विवरण आहे.

♦ भारतीय वारसा कायदा भारतातील सर्व धर्मियांना म्हणजे हिंदु, ख्रिश्चन, पारशी, अँग्लो इंडियन्स इ. यांना लागू होतो.

♦ मुस्लिम धर्मिय लोकांना हा कायदा पूर्णपणे लागू पडत नसला तरी प्रोबेट, लेटर्स ऑफ एडमिनिस्ट्रेशन इ. साठी लागू आहे. जेथे व्यक्तीगत कायद्यानुसार वारसासंबंधी प्रश्न निर्माण होत नाहीत तेथे मृत्युपत्रासाठी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या तरतुदी लागू होतात.

हिंदू वारसा कायद्याचा उगम अनेक प्राचीन ग्रंथ आणि पारंपारिक प्रथा, रुढी, रिती- रिवाज यातून झाला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या हिंदु कोड-बिलचा भाग असलेला हिंदू वारसा कायदा १७ जुन १९५६ पासून अंमलात आला.



# हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६



# हिंदू वारसा कायद्याची पार्श्वभूमी

तत्कालीन कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जनतेला सम प्रमाणात लागू होणारे पुरोगामी हिंदू कोडबिल तयार केले होते. लग्न, घटस्फोट, वारसा, दत्तकविधान तरतुदींनी सर्वसमावेशक असे हे हिंदू कोडबिल होते.

स्त्रियांना समान हक्क देणाऱ्या पुरोगामी तरतुदी या बिलमध्ध्ये होत्या.

तथापि हे बिल मंजुर न झाल्याने डॉ. आंबेडकरांचे मतभेद झाले आणि या प्रश्नावर त्यांनी पदाचा राजीनामा दिला होता.

कालांतराने हिंदू कोडबिलातच समाविष्ट असलेला एक कायदा म्हणजे हिंदू वारसा कायदा लोकसभेत १९५६ मध्ध्ये मंजूर करण्यात आला व त्यानंतर हिंदू विवाह कायदा १९५५, हिंदु पाल्य व पालकत्वाचा कायदा १९५६, हिंदु दत्तक व पोटगीचा कायदा १९५६ असे चार कायदे मंजूर झाले.

- हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १७ जुन१९५६ रोजी अंमलात आला. या कायद्यामुळे प्रचलित हिंदू वारसा पध्दतीमध्ये बदल होऊन तो कायदा संहिताबध्द (कोडिफाय) झाला आणि एकत्र कुटुंबातील विनामृत्युपत्र मिळकतीचा वारसा कोणाकडे जातो हे या कायद्याने ठरविले गेले.

- १७ जुन १९५६ या दिनांकापूर्वीच्या वारसा संबंधीचा विचार, त्यावेळेस प्रचलित रितीरिवाजाप्रमाणे तर १७ जुन १९५६ या दिनांकापूर्वी विधवा झालेल्या स्त्रिच्या बाबतीत 'द वुमेन्स राईट टु प्रॉपर्टी एक्ट', १९३७ (१४/४/१९३७) अन्वये केला जातो.

- १७ जुन १९५६ या दिनांकानंतर मयत झालेल्या स्त्री किंवा पुरुष यांच्या मिळकतीवरील वारसा हक्क हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ प्रमाणे ठरतो.

# धर्म आधारीत लोकसंख्या

## महाराष्ट्र जनगणना २०११

| हिंदू | बौध्द | जैन | शिख | मुस्लिम | पारशी | ख्रिश्चन | इतर धर्म |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७९.८३% | ५.८१% | १.२५% | ०.२०% | ११.५४ % | नगण्य | ०.९६% | ०.१७% |

हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६

शरियत कायदा १९३७

भारतीय वारसा कायदा १९२५, कलम ५० ते ५६

भारतीय वारसा कायदा १९२५, कलम ३२ ते ४९

उपरोक्त टक्केवारी लक्षात घेता हिंदू उत्तराधिकार अधिनियम महाराष्ट्रातील बहूसंख्य समाजाला लागू आहे.

# हिंदू वारसा कायदा १९५६

## मिताक्षरा पध्दतीवर आधारित आहे.

- हिंदू
- बौध्द
- शिख
- जैन

(अ) जी व्यक्ती धर्माने हिंदू आहे (वीरशैव, लिंगायत, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाजाचे अनुयायी.
(ब) जी व्यक्ती धर्माने बौध्द, जैन किंवा शिख आहे. किंवा हिंदू, बौध्द, जैन किंवा शिख धर्मात धर्मांतरित किंवा पुनर्धर्मांतरित झालेली आहे.
(क) जी व्यक्ती धर्माने मुस्लिम, ख्रिस्ती, पारसी किंवा ज्यू नाही.

हिंदू वारसा कायदा १९५६, कलम ८ अन्वये
मयत हिंदू पुरुषाचे वारस ठरविले जातात.
याचे चार वर्ग आहेत.



# मयत हिंदू पुरूषाचे वर्ग '१' (Class I) चे वारस (१२+४=१६)

- मुलगा
  - पूर्वमृत मुलाचा मुलगा (नातु)
  - पूर्वमृत मुलाची विधवा (सुन)
  - पूर्वमृत मुलीच्या पुर्वमृत मुलीचा मुलगा (पणतु)
- मुलगी
  - पूर्वमृत मुलाची मुलगी (नात)
  - पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाचा मुलगा (पणतु)
  - पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीची मुलगी (पणती)
- विधवा / अनेक विधवा - एकत्रीत हिस्सा
  - पूर्वमृत मुलीचा मुलगा (नातु)
  - पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाची मुलगी (पणती)
  - पूर्वमृत मुलीच्या पुर्वमृत मुलाची मुलगी (पणती)
- मयत व्यक्तीची आई
  - पूर्वमृत मुलीची मुलगी (नात)
  - पूर्वमृत मुलाच्या पुर्वमृत मुलाची विधवा (नात सुन)
  - पूर्वमृत मुलाच्या पुर्वमृत मुलीची मुलगी (पणती)

# मयत हिंदू पुरूषाचे वर्ग '२' (Class II) चे वारस (९ गट)

**गट एक**

वडील

वर नमुद वारस नसल्यास

**गट दोन**

मुलाच्या मुलीचा मुलगा (पणतु)

मुलाच्या मुलीची मुलगी (पणती)

भाऊ

बहीण

वर नमुद वारस नसल्यास

**गट तीन**

मुलीच्या मुलाचा मुलगा (पणतु)

मुलीच्या मुलाची मुलगी (पणती)

मुलीच्या मुलीचा मुलगा (पणतु)

मुलीच्या मुलीची मुलगी (पणती)

वर नमुद वारस नसल्यास

**गट चार**

भावाचा मुलगा

बहिणीचा मुलगा

भावाची मुलगी

बहिणीची मुलगी

वर नमुद वारस नसल्यास

गट पाच

वडीलांचे वडील (आजोबा)

वडीलांची आई (आजी)

वर नमुद वारस नसल्यास

गट सहा

वडिलांची विधवा

भावाची विधवा

वर नमुद वारस नसल्यास

गट सात

वडीलांचा भाऊ (चुलता)

वडीलांची बहिण (आत्त्या)

वर नमुद वारस नसल्यास

गट आठ

आईचे वडील (आजोबा)

आईची आई (आजी)

वर नमुद वारस नसल्यास

गट नऊ

आईचा भाऊ (मामा)

आईची बहीण (मावशी)

टिप - या अनुसूचीत भाऊ व बहीण यामध्ये एकच आई परंतु भिन्न वडील असलेला भाऊ किंवा बहीण यांचा समावेश होणार नाही.

## मयत हिंदू पुरूषाचे वर्ग '३' (Class III) चे वारस

**मयताचे गोत्रज** - मयताचे पितृबंधू म्हणजेच रक्ताच्या संबंधामुळे किंवा दत्तकग्रहणामुळे पूर्णपणे पुरुषाद्वारे संबंध असलेल्या,

एक गोत्र असलेल्या व्यक्ती.

↓ वर नमुद वारस नसल्यास ↓

## मयत हिंदू पुरूषाचे वर्ग '४' (Class IV) चे वारस

**मयताचे भिन्न गोत्रज** - मयताचे मातृबंधू, म्हणजेच रक्ताच्या नात्यामुळे किंवा दत्तकग्रहणामुळे पूर्णपणे पुरुषाद्वारे संबंध नसलेल्या, भिन्न गोत्र असलेल्या व्यक्ती.

## मयत हिंदू पुरुषाला

वर्ग '१' चे वारस जेव्हा नसतील तेव्हाच वर्ग '२' मधील वारस विचारात घ्यायचे आहेत.

⬇

वर्ग '१' आणि वर्ग '२' चे वारस जेव्हा नसतील तेव्हाच वर्ग '३' मधील वारस विचारात घ्यायचे आहेत.

⬇

वर्ग '१' वर्ग '२' आणि वर्ग '३' चे वारस नसतील तेव्हाच वर्ग '४' मधील वारस विचारात घ्यायचे आहेत.

⬇


**मयताला वर्ग १ ते ४ मधील कोणतही वारस नसल्यास त्याची मिळकत शासन जमा होईल**

# हिंदू वारस कायदा कलम ९ अन्वये

वर नमूद केलेल्या चार वर्गांच्या वारसांच्या बाबतीत उत्तराधिकाराचा क्रम खालीलप्रमाणे असेल.

वर्ग '१' मधील वारस असतील तेव्हा वर्ग '२', '३' आणि '४' या वर्गातील वारसांना वगळून मयत व्यक्तीच्या मिळकतीचे वाटप होईल, याचा अर्थ उर्वरीत तीन वर्गातील वारसांना मिळकतीमध्ये हिस्सा प्राप्त होणार नाही.

# हिंदू वारसा कायदा १९५६, कलम १४, १५ आणि १६.
# हिंदू स्त्रिची मालमत्ता आणि वारस.



# हिंदू वारसा कायदा. कलम १४

हिंदू वारसा कायदा १९५६ अंमलात येण्यापूर्वी किंवा अंमलात आल्यानंतर, कोणत्याही हिंदू स्त्रिची, तिच्या कब्जात असलेली कोणतीही संपत्ती, मग अशी मालमत्ता तिला.....

- विवाहापूर्वी किंवा
- विवाहानंतर वारसाहक्काने,
- मृत्यूपत्रीय दानाने,
- वाटणीमध्ये,
- पोटगी म्हणून,
- नातलगांकडून मिळालेली असो किंवा
- तिने अशी मालमत्ता स्वत:च्या कौशल्याने,
- परिश्रमाने किंवा
- एखादी संपत्ती दान म्हणून,
- मृत्युपत्रान्वये,

- इतर कोणत्याही लेखान्वये,
- दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये, आदेशान्वये किंवा
- एखाद्या निवाड्यान्वये संपादित केली गेली असेल किंवा
- अन्य कोणत्याही मार्गाने संपादित केलेली असो,

अशी संपत्ती, ती हिंदू स्त्री संपूर्ण स्वामी म्हणून धारण करील, मर्यादित स्वामी म्हणून नव्हे.

तथापि, असे दानपत्र, मृत्युपत्र, अन्य लेख, हुकूमनामा, आदेश किंवा निवाडा काही अटी किंवा शर्तींच्या आधिन ठेवल्यामुळे त्या संपत्तीत तिचे निर्बंधीत अधिकार निर्माण होत असतील तर अशा संपत्तीला या उपरोक्त तरतुदी लागू होणार नाहीत.

# हिंदू वारसा कायदा, कलम १५
## विनामृत्युपत्र, मयत हिंदू स्त्रिची मालमत्ता

विनामृत्युपत्र मयत झालेल्या हिंदू स्त्रिची संपत्ती पुढील प्रमाणे वारसाहक्काने जाईल.

अ) पहिल्यांदा, तिचे मुलगे व मुली (कोणताही मयत मुलगा किंवा मुलगी यांची अपत्ये धरून) आणि पती यांच्याकडे,

आ) उपरोक्त वारस नसतील तर पतीच्या वारसांकडे

इ) उपरोक्त दोन्ही प्रकारातील वारस नसतील तर त्या मयत स्त्रिच्या तिच्या माता आणि पिता यांच्याकडे

ई) उपरोक्त दोन्ही प्रकारातील वारस नसतील तर त्या मयत स्त्रिच्या पित्याच्या वारसाकडे आणि

उ) शेवटी, मातेच्या वारसांकडे कलम १६ मध्ये दिलेल्या नियमानुसार प्रक्रांत होईल.

तथापि,
(क) हिंदू स्त्री जर विनामृत्युपत्र मरण पावली तर तिला तिच्या पित्याकडून किंवा मातेकडून वारसा हक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती त्या मृत स्त्रिचा कोणताही मुलगा किंवा मुलगी (कोणत्याही मयत मुलाची किंवा मुलीची अपत्ये धरून) यांच्याकडे जाईल. तिला असे वारस नसल्यास अशी संपत्ती मृत स्त्रिच्या पित्याच्या वारसाकडे प्रक्रांत होईल, पती किंवा पतीच्या वारसांकडे जाणार नाही.

आणि

(ख) मयत हिंदू स्त्रिला तिच्या पतीकडून किंवा तिच्या सासऱ्याकडून वारसा हक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती, त्या मृत स्त्रिचा कोणताही मुलगा किंवा मुलगी (कोणत्याही मयत मुलाची किंवा मुलीची अपत्ये धरून) आणि पती यांच्याकडे जाईल. तिला असे वारस नसल्यास अशी संपत्ती, त्या मयत हिंदू स्त्रिच्या पतीच्या वारसाकडे प्रक्रांत होईल.

## हिंदू वारसा कायदा, कलम १८

जर नातेसंबंधाचे स्वरूप अन्य प्रत्येक बाबतीत तेच असेल तर, अकृतमृत्युपत्र व्यक्तीशी सख्ख्या नात्याने संबंधीत असलेल्या वारसांना, सापत्न नात्याने संबंधीत असलेल्या वारसापेक्षा अधिमान दिला जाईल.

## हिंदू वारसा कायदा, कलम २०
## गर्भस्थ आपत्य

अकृतमृत्युपत्र खातेदाराच्या मृत्यूसमयी जे अपत्य गर्भात होते व नंतर जिवंत जन्मले, त्याला किंवा तिला जणुकाही अकृतमृत्युपत्र व्यक्तिच्या मृत्युपूर्वी जन्मले होते अशाच प्रकारे अकृतमृत्युपत्र व्यक्तीचा वारस होण्याचा अधिकार असेल.

## हिंदू वारसा कायदा, कलम २३
## राहत्या घरासंबंधी

जर अकृतमृत्युपत्र व्यक्तीला वारसदार कन्या असेल आणि जर ती अविवाहित असेल किंवा तिच्या पतीने तिला सोडून दिले असेल अथवा ती पतीपासून विभक्त झाली असेल किंवा ती विधवा असेल आणि ती अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या घरात राहत असेल तर तिला राहत्या घरात राहण्याचा अधिकार प्राप्त होईल.

## हिंदू वारसा कायदा, कलम २४
## हे कलम रद्द करण्यात आले आहे

मुलाच्या मुलाची विधवा किंवा भावाची विधवा यांनी वाटप दिनांकाच्या वेळेस दुसरे लग्न केले असेल तर त्यांना अकृतमृत्युपत्र खातेदाराच्या संपत्तीचा वारसा मिळण्याचा हक्क मिळत नसे. हे कलम आता रद्द करण्यात आले आहे.

# संपत्तीत वारस म्हणून हिस्सा मिळण्यास अपात्र व्यक्ती

पुढील व्यक्तींना वारसाने संपत्ती मिळण्यास अनर्ह ठरण्यात आले आहे :

♦ **कलम २५: खुनी व्यक्ती** - जी व्यक्ती खातेदाराचा खून करेल किंवा खून करण्यास अपप्रेरणा देईल ती खून झालेल्या खातेदाराच्या संपत्तीत वारसाने अथवा उत्तराधिकाराने हिस्सा मिळण्यास अपात्र ठरेल.

♦ **कलम २६: धर्मांतरित व्यक्ती**- या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, एखादी व्यक्ती धर्मांतर केल्याने हिंदू राहिली नसेल तर अशी व्यक्ती, धर्मांतरानंतर तिला झालेली आपत्ये व त्यांचे वारस एकत्र कुटुंबातील संपत्तीत वारसाने अथवा उत्तराधिकाराने हिस्सा मिळण्यास अपात्र ठरतील. तथापि, याबाबत विविध न्यायालयांची मते भिन्न आहेत.

♦ **कलम २७:** वाटपास अपात्र व्यक्ती जणू काही मयत आहे असे समजून वाटप करण्यात यावे.

♦ कलम २८: कोणतीही व्यक्ती, कोणत्याही व्याधी, वैगुण्य किंवा व्यंग असल्याच्या कारणावरून अथवा या अधिनियमात उपबंधित केलेले आहे ते खेरीज करून अन्य कोणत्याही कारणावरून कोणत्याही संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास अपात्र असणार नाही.

♦ कलम २९: जर अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मागे अधिनियमाच्या उपबंधानूसार त्याच्या किंवा तिच्या संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास पात्र असेलला कोणताही वारस हयात राहिला नसेल तर अशी संपत्ती शासनाकडे प्रक्रांत होईल आणि शासन ती संपत्ती, वारस ज्यांना आधिन झाला असता त्या सर्व आबंधनांच्या व दायित्वांच्या आधिनतेने घेईल.

♦ कलम ३०: कोणत्याही हिंदू पुरुष किंवा स्त्रिला त्याने/तिने मृत्यूपत्राद्वारे किंवा अन्य मृत्यूपत्रीय व्यवस्थेद्वारे विल्हेवाट करण्याजोगी असेल अशा कोणत्याही संपत्तीची भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे उपबंध किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला व हिंदूना लागू असलेला अन्य कोणत्याही विधी यानुसार तशी विल्हेवाट करता येईल.

# हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम २००५






## प्रतिकात्मक वाटप किंवा नोशनल पार्टिशन

हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम २००५ अंमलात येण्यापूर्वी एखाद्या एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकतीत हक्क असणारा सहदायक (कोपार्सनर) मयत झाला असेल तर त्याच्या मुलीला प्रतिकात्मक पध्दतीने मिळकतीचे वाटप होऊन हिस्सा मिळत होता. याला इंग्रजीत नोशनल पार्टिशन तर मराठीत प्रतिकात्मक वाटप असे म्हणत.

खालील उदाहरणावरून मिळकतीचे प्रतिकात्मक वाटप किंवा नोशनल पार्टिशन कसे होत असे हे स्पष्ट होईल.


# प्रतिकात्मक वाटपाचे उदाहरण

एका एकत्र हिंदू कुटूंबातील कर्ता पुरूष दिनांक ९.९.२००५ पूर्वी मयत झाला.

त्याच्या नावे नऊ एकर शेतजमीन असून त्याला एक पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असे वारस आहेत.

या प्रकरणात प्रतिकात्मक वाटप खालील प्रमाणे होईल.




एकूण मिळकतीचे प्रथम
तीन हिस्से होतील
मयत व्यक्तीचा हिस्सा
एक तृतियांश (१/३)
मयत व्यक्तीच्या विधवेचा हिस्सा
एक तृतियांश (१/३)
मयत व्यक्तीच्या मुलाचा हिस्सा
एक तृतियांश (१/३)

त्यानंतर
मयत व्यक्तीच्या एक तृतियांश हिश्शाचे पुन्हा तीन हिस्से होतील

मयत व्यक्तीच्या विधवेचा हिस्सा


एक नवमांश (१/९)

मयत व्यक्तीच्या मुलाचा हिस्सा

एक नवमांश (१/९)

मयत व्यक्तीच्या मुलीचा हिस्सा

एक नवमांश (१/९)


प्रत्येक वारसाला मिळणारा एकूण हिस्सा
मयत व्यक्तीच्या विधवेला
१/३ + १/९
मयत व्यक्तीच्या मुलाला
१/३ + १/९
मयत व्यक्तीच्या मुलीला
१/९

उपरोक्त मयत व्यक्तीच्या नऊ एकर शेतजमिनीतुन त्याच्या विधवेला चार एकर, मुलाला चार एकर आणि मुलीला एक एकर असा हिस्सा प्रतीकात्मक वाटपानुसार मिळेल.

मयत व्यक्तीला एकापेक्षा जास्त मुली असल्या तर प्रथम मिळकतीचे तीन हिस्से होतील आणि दुसऱ्या टप्प्यात मुलींच्या संख्येप्रमाणे हिस्से वाढतील.



# हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम २००५

केंद्र शासनाने हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ हा हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ मध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी अंमलात आणला.

यानुसार हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ च्या कलम ६ मध्ये सुधारणा यात आल्या.

✓ हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ कलम ६ (१) - मिताक्षर कायद्याने नियंत्रीत केल्या जाणाऱ्या संयुक्त हिंदू कुटुंबामध्ये सहदायकाची कन्या:

(अ) ज्या रीतीने पुत्र सहदायाद होतो, त्याच रीतीने जन्मापासून, तिच्या स्वत:च्या हक्कामुळे पुत्राप्रमाणेच सहदायाद होईल.

(ब) सहदायिकीतील मालमत्तेमध्ये तिला पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार असतील.

(क) सहदायिकीतील मालमत्तेमध्ये कन्येलाही पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार, दायित्वे, प्राप्त होतील.

तथापि,

दिनांक २० डिसेंबर २००४ पूर्वी ज्या वाटण्या घडून आल्या असतील त्यांना उपरोक्त तरतुदींमुळे बाधा येणार नाही.

(२) वरील प्रमाणे हिस्सा मिळालेली स्त्री, त्या हिस्स्याबाबत मृत्युपत्राद्वारे किंवा अन्य प्रकारे अशा मिळकतीची विल्हेवाट सुध्दा लावू शकेल.

सन २००५ च्या या सुधारणा कायद्यान्वये ९ सप्टेंबर २००५ पूर्वी जन्मलेल्या मुलींना तसेच दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असलेल्या हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क असेल अशी तरतुद केली गेली.

# मा. सर्वोच्च न्यायालय
# प्रकाश विरुद्ध फुलवती प्रकरण

हिंदू वारसा कायद्याखालील दिवाणी अपील क्रमांक ७२१७/२०१३, प्रकाश विरुद्ध फुलवती प्रकरणात दिनांक १६.१०.२०१५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊन 'वडिलोपार्जित हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुला इतकाच जन्मजात हक्क मिळणारी मुलगी आणि त्या मिळकतीत हक्क असणारा तिचा पिता हे दोन्ही दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी म्हणजेच सदर सुधारणा अंमलात आलेल्या दिवशी हयात असावेत, मग ती मुलगी कधीही जन्मलेली असो' असा निकाल दिला होता.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निकालामुळे मोठ्या प्रमाणात वाद निर्माण होण्यास सुरुवात झाली होती.

## मा. सर्वोच्च न्यायालय
## दानम्मा सुमन सुरपूर विरुद्ध अमर

त्यामुळे पुन्हा दिनांक १.२.२०१८ रोजी, दानम्मा सुमन सुरपूर विरुद्ध अमर यादव या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊन या बाबतीतला संभ्रम मिटवला आहे.

याबाबत निकाल देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने खुलासा केला आहे की, 'हिंदू वारसा कायद्याच्या कलम सहामध्ये सन २००५ च्या दुरूस्तीमध्ये, मुलींना मुलांप्रमाणेच अधिकार प्राप्त होतील अशी शब्दरचना वापरली गेली आहे, त्यामुळे ज्या प्रकारे हिंदू एकत्र कुटुंबातील मुलांना त्या एकाच कुटुंबातील मिळकतीमध्ये जन्मतःच वारसा हक्क प्राप्त होतो व हिस्सा मिळतो त्याच प्रमाणे मुलींनाही एकत्र कुटुंबातील मिळकतीमध्ये जन्मत:च वारसा हक्क प्राप्त होण्याचा व हिस्सा मिळण्याचा अधिकार आहे.'

उपरोक्त निकालामुळे आता हिंदू एकत्र कुटुंबातील मिळकतीमध्ये मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क आणि हिस्सा मिळणारी मुलगी आणि त्या मिळकतीत हक्क असणारा तिचा पिता हे दोन्ही दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असावेत ही अट आता रद्द होऊन मुलींनाही मुलांप्रमाणेच संपत्तीत जन्मत:च समान हिस्सा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

# महत्वाचे न्यायालयीन निर्णय

♦ हिंदू विधवा स्त्रीला, सन १९५६ नंतर तिच्या पतीच्या निधनानंतर कोणत्याही अटी शर्ती शिवाय मिळकत प्राप्त झाली असेल तर ती त्या मिळकतीची संपूर्ण मालक बनेल व त्यानंतर त्या विधवेने दुसरे लग्न केले तरीही तिला पती निधनानंतर मिळालेल्या मिळकतीवरील तिचा अधिकार नष्ट होणार नाही.

*(एआयआर-१९७१, मुंबई ४१३)*

♦ वडिलांनी वाटपात मिळालेल्या मिळकतीच्या पैशातून काही मिळकत खरेदी केल्यास ती मिळकत वडीलांच्या मालकीची होईल. त्या मिळकतीत त्यांचा मुलगा किंवा मुली सहदायाद (कोपार्सनर) होणार नाहीत.

*(एएमआर-२००५(३),७८९)*

♦ एकत्र कुटुंबामध्ये एखादी मिळकत खरेदी केली असेल आणि त्या खरेदीसाठी रक्कम एकत्र कुटुंबाची होती असे सिध्द करावयाचे असेल तर अशी मिळकत खरेदी करतांना एकत्र कुटुंबाकडे पुरेसा पैशाचा गाभा होता हे सिध्द करावे लागेल.

*(एएमआर-१९६५, एससी २८९)*

♦ विधवेची शिलभ्रष्टता तिला वाटपास अपात्र ठरवित नाही. विधवा जरी शिलभ्रष्ट असली तरी तिच्या नव-याचा हिस्सा तिला द्‌यावाच लागेल.

*(एआयआर-१९७६, कलकत्ता, ३५६ : एआयआर -१९७८ कलकत्ता, ४३१)*

♦ हिंदू विवाह कायदा, कलम १६ अन्वये, वडिलांच्या स्वकष्टार्जित मिळकतीत अनौरस मुलांना हिस्सा मिळण्याचा अधिकार असेल परंतु वडिलांकडे असलेल्या वडिलोपार्जित मिळकतीत अनौरस मुले व दुसरी पत्नी यांना हिस्सा मिळणार नाही.

*(एआयआर-१९९६, अेसी-१९६३ : एआयआर-१९८३, मुंबई-२२२)*

♦ एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये सर्व सभासदांचा एकत्र हक्क व सामाईक कब्जा असतो. प्रत्येक सहवारसदारास त्या मिळकतीचा उपभोग घेण्याचा समान हक्क असतो. केवळ एखादया सहवारसदाराचा प्रत्यक्ष कब्जा नाही म्हणून त्याचा हक्क संपुष्टात येणार नाही. एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये जरी कोणत्याही एका सदस्याचा कब्जा असला तरी असा कब्जा सर्व सहवारसदारांचा मिळून एकत्रीत आहे असे गृहीत धरले जाते.

*(एआयआर-१९९५, एससी-८९५)*

♦ स्त्री धनाची मिळकत ही त्या स्त्रीच्या संपूर्ण मालकीची असते. तिला त्याची वैयक्तीक ईच्छेनुसार विल्हेवाट लावता येते. स्त्री धन ही एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा भाग नसतो.
*(एएमआर-२०११(६),४२८ एससी)*

♦ बेकायदेशीरपणे केलेल्या दुस-या लग्नाच्या पत्नीला मयत नवऱ्याच्या मिळकतीत हिस्सा मिळणार नाही.
*(एआयआर-२००२ गोहत्ती,९६)*

♦ वारसा हक्क ठरविणे, मिळकतीमधील वारसांचे हिस्से ठरविणे ही दिवाणी बाब आहे. मात्र एखादा खातेदार मयत झाल्यावर भूमी अभिलेखात, महसूल वसुलीसाठी) वारस नोंदविण्याचा ठरविण्याचा अधिकार महसूल अधिकाऱ्यांना आहे.

♦ एखादा खातेदार सात किंवा अधिक वर्षे परागंदा असेल आणि त्याचा ठावठिकाणा किंवा बातमी मिळून येत नसेल तर संबंधिताने दिवाणी न्यायालयात तसे सिध्द करून, भारतीय पुरावा कायदा, १८७२, कलम १०७, १०८ अन्वये दिवाणी न्यायालयामार्फत वारस दाखला प्राप्त करून, असा दाखला, प्रतिज्ञापत्रासह महसूल अधिकाऱ्याकडे सादर केल्यास परागंदा व्यक्तीची वारस नोंद करण्यात येते.

♦ हिंदू वारस कायद्यातील सुधारणेपूर्वी महिलांचा संपत्तीमधील वारसा हक्क निश्चित नव्हता त्यामुळे महिला वारसांची नावे सात-बाराच्या इतर अधिकारामध्ये नोंदविण्यात येत होती. आता उपरोक्त कायद्‍यातील सुधारणेन्वये महिलांना मिळकतीत समान हिस्सा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

अद्‍यापही काही महिला वारसांची नावे सात-बाराच्या इतर अधिकारामध्ये नोंदविलेली असतील तर त्यांनी म.ज.म.अ. कलम १५५ अन्वये तहसिलदारांकडे अर्ज करावा. यासंदर्भात तहसिलदार यांना स्वत:हून (Suo-moto) सुध्दा असे प्रकरण सुरू करता येईल.

## हिंदु वारसा कायद्यातील काही इंग्रजी शब्दांचे कायदेशीर अर्थ

- **Testator:** अशी व्यक्ती ज्याने मृत्युपूर्वी मृत्युपत्र केले आहे.
- **Intestate:** अशी व्यक्ती ज्याने मृत्युपूर्वी मृत्युपत्र केलेले नाही.
- **Legatee/Beneficiary:** अशी व्यक्ती ज्याला मृत्युपत्रान्वये मालमत्ता मिळाली आहे.
- **Executor:** अशी व्यक्ती ज्याची नेमणूक मृत्युपत्र करणार्याने किंवा आदेशान्वये न्याायालयाने, मयताच्या मालमत्तेचे मृत्युपत्रानुसार वाटप करण्यासाठी केलेली आहे. अशी व्यक्ती मृत्युपत्र करणाऱ्या मयत व्यक्तीची कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम करते.

# धन्यवाद

# Thank You

डॉ. संजय कुंडेटकर,

उपजिल्हाधिकारी